# सीरिया - पर्यायाने मध्य-पूर्व: विनाशाचे अनेक पदर

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

मध्य-पूर्वेतील वर्तमान घटना प्रादेशिक व म्हणून जागतिक शांततेला आश्वासक नाहीत. त्यातील वाढती गुंतागुंत आजवर सामान्य नागरिकांना जीवघेणी ठरलेली आहे आणि नजीकच्या भविष्यात अधिकाधिक तीव्र होईल अशी चिन्हे आहेत.




सीरिया हे संघर्षाचे दृश्य स्थान असले तरी येमेन, पॅलेस्टाईनमधील परिस्थिती दगडापेक्षा वीट मऊ इतपतच बरी म्हणता येईल. सीरियातील यादवीचे आता आठवे वर्ष सुरु झाले आहे. त्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिकृत आकडेवारीनुसार साडेतीन लाख लोक बळी पडले आहेत. (बहुतांशी निरपराध नागरिक, त्यात स्त्रिया व मुले बहुसंख्य, कारण पुरुष 'युद्धावर'.) अनधिकृत आकडेवारीनुसार पाच लाखाहून अधिक बळी गेले आहेत. २०१४ ला पावणे दोन कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशातील आज निम्मे देशांतर्गत स्थलांतरित आणि ४० लाख देशोधडीला लागलेले निर्वासित आहेत.

या नरसंहाराचे गुन्हेगार अनेक आहेत. सीरियाचा राष्ट्राध्यक्ष बशर असद, त्याला पाठिंबा देणारे इराण व रशिया. आणि या फळीचे विरोधक. हे विरोधक विस्कळित व निरनिराळ्या कारणांनी, कधी कधी परस्पर विरोधी कारणांनी, असदच्या विरोधात आहेत.

मार्च २०११ ला अरब वसंतादरम्यान सीरियातही लोकशाहीची मागणी सुरू झाली. त्यात वैध मार्गाने असदविरोधी निदर्शने सुरू झाली. सत्ता जाईल म्हणून असदने तो विरोध दडपला. मग तोपर्यंत अहिंसक असणारे काही विरोधक हिंसेकडे वळले. त्यांना पश्चिमेतील लोकशाही देशांचा पाठिंबा अपेक्षित होता, तो मिळाला नाही.

दरम्यान इस्लामिक स्टेट (ISIS - इसीस) या कट्टर मूलतत्त्ववादी हिंसक संघटनेचा उदय झाला होता. ही संघटना सुन्नी मुस्लीम आणि असदची राजवट शिया मुस्लीम. त्यामुळे या विरोधाला पंथीय वैराचे परिमाण मिळाले. ISIS बरोबरच पण वेगळी ध्येये असणारे अनेक सुन्नी गट सीरियात आहेत, त्यात अल-कईदाची स्थानिक शाखाही. मध्य-पूर्वेतील एकमेव शिया राजवट इराण. इराणला या सुन्नी संघटनांना सीरियात बस्तान बसवू द्यायचे नव्हते व नाही. त्यामुळे इराणने एका स्तरावर आपले वरिष्ठ लष्करी अधिकारी असदला सल्लागार म्हणून पाठवले, तर दुसऱ्या स्तरावर 'सैनिक' पाठवले. हे सैनिक म्हणजे लेबानन या सीरियाच्या शेजारी देशात सक्रिय असणाऱ्या हेजबोल्ला या संघटनेचे सशस्त्र 'कार्यकर्ते'; त्यांच्याबरोबर इराक, पाकिस्तान, अफगाणिस्तान मधून आयात केलेले शिया सैनिक. (एकूण असे 'बाहेरचे' सैनिक साठ हजाराहून जास्त असावेत). ते असदच्या सैन्याबरोबर लढतात. इराकमध्ये सद्दाम हुसेनपर्यंत राजवट सुन्नी होती. त्याच्यानंतर तेथे सुन्नी प्रभाव येऊ नये म्हणून इराणने हेच तंत्र वापरले आहे.

या सुंदोपसंदीत रशियाने असदच्या बाजूने सप्टेंबर २०१५ला अचानक सशस्त्र हस्तक्षेप केला. सांगायला हा प्रवेश असदच्या विनंतीवरून होता. पण खरी कारणे निराळी. एक तर रशियाचा मध्य-पूर्वेतील एकमेव लष्करी तळ एका सीरियन बंदरात आहे. असद पडल्यास तो तळ मुस्लीम आतंकवाद्यांच्या हाती जाणे रशियाला परवडणारे नाही. दुसरे म्हणजे ISIS तर्फे लढणाऱ्या आंतरराष्ट्रीय जिहादी सैनिकांत रशियातील मुस्लीम छुपेपणे गेलेले आहेत. ही मंडळी रशियाला परतल्यास रशियाअंतर्गत मुस्लीम मूलतत्त्ववाद व अशांतता वाढणार - ही शक्यता. तिसरे कारण रशिया जागतिक पटलावर निर्णायक भूमिका घेऊ शकतो हे दाखवण्याची अध्यक्ष पुतीनची महत्त्वाकांक्षा.

शिवाय, जेव्हा केव्हा युद्ध संपेल, त्यानंतर सीरियाच्या पुनर्वसनाची कंत्राटे मिळवण्यासाठी इराण व रशिया उत्सुक आहेत. ती चुरस सुरु झाली आहे. आज या पुनर्वसनाचा अंदाज २०० बिलियन डॉलर्स आहे. एक बिलियन म्हणजे एकावर नऊ शून्ये.

असदच्या विरोधातील हिंसक गट नागरी वस्त्यांमध्ये मिसळून रहातात व त्या लोकांचे कवच करतात. पण स्त्रिया, मुले, निरपराध यांच्यावर हल्ला करू नये, हॉस्पिटल्स, शाळांवर हल्ले करू नयेत असे कोणतेही संकेत या यादवीत दोनही बाजूंनी मानलेले नाहीत. त्यामुळे एखाद्या तालुक्यात किंवा गावात किंवा वस्तीत काही

आतंकवादी असावेत या संशयावरून अख्खी वस्ती नष्ट करण्याचे प्रकार असदकडून चालू आहेत, किंवा एखाद्या वस्तीत सरकारी 'खबऱ्या', फितूर आहे असा आतंकवाद्यांना संशय आला तर तेही अख्खी वस्ती नष्ट करतात.

पूर्व घूटा या दमास्कसजवळच्या शहरात आपल्याविरोधी आतंकवादी आहेत हा असदचा बरीच वर्षे दावा आहे. तेथे तर या वर्षीच्या जानेवारीपासून मार्चपर्यंत इतके तीव्र बॉम्बिंग चालू होते की रोज हजारांनी लोक शहर सोडून जाऊ लागले, उरलेले जमिनीखालच्या बोगद्यामध्ये राहू लागले. खायला नाही, मोकळी हवा नाही, मुलांना मोकळेपणा नाही: असा नरक. रशियन विमानदलाचे बेगुमान हवाई हल्ले, रासायनिक अस्त्रे (ही अस्त्रे उत्तर कोरियाने दिल्याचे पुरावे आहेत.) यामुळे प्रदेश बेचिराख झाला, मुले अपंग झाली आणि हा 'विजय' साजरा करण्यासाठी असद मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात तेथे गेलाही.

सीरियाच्या उत्तर भागात कुर्द लोक बहुसंख्य आहेत. ते अरब नाहीत. त्यांना असदची राजवट मान्य नाही. कुर्द लोक सीरिया, तुर्कस्तान, इराक व इराणच्या संलग्न प्रदेशात आहेत आणि आपले स्वत:चे राष्ट्र असावे असे त्यांचे  दुसऱ्या महायुद्धापासूनचे अपूर्ण स्वप्न आहे. सीरियाच्या गेल्या आठ वर्षांत असदचे केंद्रीय सरकार दुबळे झाल्याने आपल्याला स्वायत्ततेची ही संधी आहे असा त्यांचा होरा. इसीस त्यांच्याही विरुद्ध. म्हणून सुरुवातीला इसीसला विरोध करण्यासाठी अमेरिकेने कुर्दांना मदत केली. आपल्या देशांतील कुर्द फुटीर आहेत आणि त्यांना सीरियातील कुर्दांचा पाठिंबा आहे असा तुर्कस्तानचा दावा आहे. त्यामुळे तुर्कस्तान या तिसऱ्या बाहेरच्या शक्तीचा या संग्रामात प्रवेश झाला आहे. (इराण व रशिया या इतर दोन शक्ती). त्या मोहिमेचा भाग म्हणून तुर्कस्तानने आपल्या सीमेजवळील सीरियातील आफ्रिन प्रदेशात आपले सैन्य घुसवले. मार्चच्या तिसऱ्या आठवड्याच्या सुरुवातीला, म्हणजे लेख लिहिण्याच्या वेळी आफ्रिन तुर्कस्तानने काबीज केले. कुर्द सेनेने तुर्कस्तानला तेथे रहाणे अशक्य करू असे लगेचच जाहीर केले आहे, म्हणजे, या नव्या ठिकाणी अशांतता होणार कारण तुर्कस्तानने (अक्षरश:) त्यांचा झेंडा तिथे फडकवला आहे, ते काही इतक्यात आफ्रिन सोडत नाहीत. १९ मार्चला तर तुर्क अध्यक्षाने आता आम्ही सीरियातील व इराकमधील इतर कुर्द-बहुल प्रदेश काबीज करू असे जाहीर केले.

सीरियातील कुर्द ISIS च्या विरुद्ध सीरियाच्या इतर प्रदेशात अमेरिकेच्या पाठिंब्यावर लढत होते, ते तेथून आफ्रिनला तुर्कांविरुद्ध लढण्यासाठी आले. म्हणजे इतरत्र ISISला पुनर्जन्माची ही संधी आहे. अमेरिकेचे २००० सैनिक आज सीरियात आहेत, ते ISIS समूळ नष्ट करण्यासाठी. इराकमधून अमेरिका घाईने बाहेर आल्याने तेथे मुस्लीम आतंकवादी परत फोफावले. ही 'चूक' सीरियात होऊ नये असा अमेरिकेचा तार्किकदृष्ट्याबरोबर प्रयत्न असावा पण अतर्क्य ट्रम्प महाशयांनी परराष्ट्रमंत्री नुकताच अचानक बदलल्यामुळे त्याबाबत नक्की काय होईल हे सांगता येत नाही. तुर्कस्तान व अमेरिकन सैन्य एकमेकांविरुद्ध - दोन्ही देशNATOचे सभासद! - उभे राहण्याची शक्यता तरी निर्माण झाली आहे.

आजवर रशिया कुर्द आणि तुर्कस्तान या दोन्हींना 'सांभाळून' घेत असे. आता ती परिस्थिती बदलली आहे. तुर्कस्तान सरळ कुर्दांच्या विरुद्ध उभा राहिला आहे. त्यामुळे रशियाचा आपण या संग्रामाचे भविष्य ठरवणार हा भ्रम विरत आहे. असद सत्तेत राखणे हा रशियाचा हेतू आणि त्याला पदच्युत करणे हा तुर्कस्तानचा प्रयत्न हे परस्परविरोधी आहेत.

त्यात विशेष म्हणजे, रशिया-तुर्कस्तान विरुद्ध बाजूंना पाठिंबा देत असले, तरी आजवर ते शक्यतो एकमेकांशी संघर्ष टाळत असत. ही परिस्थिती बदलत आहे.

इस्राएल ही या प्रदेशातील आणखी एक शक्ती. त्यांचे इराणशी हाडवैर आहे. इराणने फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात सीरियातून इस्राएलवर एक स्वयंचलित drone पाठवले. इस्राएलने ते पाडले आणि त्याचा सीरियातील नियंत्रणकक्ष उद्ध्वस्त केला. हा हल्ला करणारे इस्राएली लढावू विमान सीरियावरून इस्राएलला परतत असताना सीरियाच्या विमानवेधी क्षेपणास्त्राने ते पाडले. प्रत्युत्तर म्हणून इस्राएलने सीरियावर पुन्हा हल्ला करून सीरियाची अशी विमानवेधी अस्त्रे पाठवण्याची एक-तृतीयांश क्षमता नष्ट केली. इस्राएलची इच्छा व क्षमता आणखी विध्वंस करण्याची होती पण या विमानवेधी तळाशेजारी मोठा रशियन तळ आहे म्हणून  पुतीनने तत्काळ इस्राएलच्या पंतप्रधानाला फोन करून तो हल्ला होऊ दिला नाही. इस्राएलच्या कारवाया आजवर तरी अशा मर्यादित प्रमाणात तेथे चालू आहेत. तरी आजतागायत त्यांनी १०० वर हवाई हल्ले सीरियात केले आहेत - मुख्यत: शस्त्रांच्या गोदामांवर आणि इराणी सैन्याला पुरवठा करणाऱ्या ताफ्यांवर. पण हा 'तेरे भी चूप, मेरे भी चूप' असा प्रकार आहे. कारण इराण-सीरियाला हे हल्ले झाले असे  मान्य करणे म्हणजे इस्राएलची गुप्तहेर संघटना आपल्यावर कडी नजर ठेवून आहे, हे मान्य करणे आहे. या कारवाया वाढण्याचा संभाव आहे कारण सीरियाचा तळ करून उद्या इराण आपल्याविरुद्ध कारवाया करणार, असदला आपले बाहुले तरी करणार किंवा इराणला अनुकूल शिया राजवट असदनंतर बसवणार ही इस्राएलची खात्री आहे. इराणला उद्या सीरियात आरमारी तळही उभारायचा आहे. सध्या तरी इस्राएल-इराण समक्ष युद्धापर्यंत पोचत नाहीत, ते एकमेकांची ताकद जोखत आहेत. इस्राएलच्या अखत्यारीतील गोलन टेकड्या हा प्रदेश सीरिया-इस्राएलच्या सीमेवर येतो, तेथून आता असदचे विरोधक असदच्या  सैन्याने जवळ जवळ हुसकावून लावले आहेत किंवा

ठार मारले आहेत. तेथून इराण आपल्यावर हल्ले करणार या गृहीतावर इस्राएलने नियोजन सुरूही केले आहे.

एकूण या विनाशाचे अनेक पदर आहेत. शिया असदची स्वत:ची सत्ता टिकवण्याची धडपड व त्यासाठी आपल्याच जनतेची अमानुष कत्तल; रशिया-इराणचा विस्तारवाद; कुर्द लोकांचे स्वायत्ततेचे प्रयास, इस्राएल-इराण वैर आणि सुन्नी मुस्लीम आतंकवाद. भर म्हणून, उद्या इराण अण्वस्त्रक्षम झालाच तर आम्हीही अण्वस्त्रक्षम होऊ अशी गर्जना सौदी अरेबिया या प्रादेशिक सुन्नी शक्तीने केली आहे. इराण-इस्राएल युद्धाची चाहूलही दुर्लक्षिता येत नाही.

परिणामत: आज असदच्या अमलाखाली आधीच्या सीरियाच्या फक्त २२ टक्के भूप्रदेश आहे. रशिया, तुर्कस्तान, इराण यांनी आपल्या प्रभावक्षेत्राखाली सीरियाचे भू -भाग वाटून घेतले आहेत, ते अधिकृत नाहीत एवढेच. याची किंमत आजवर पाच लाख मृतांनी आणि एक कोटीहून अधिक विस्थापितांनी मोजली आहे, त्या वेदनेला अंतही दिसत नाही.

*www.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*

# ऑक्सफॅमची नाचक्की

हैती या अमेरिकेजवळच्या बेटावरील देशात २०१० साली प्रचंड भूकंप झाला. सव्वा-दोन लाख लोक मरण पावले, तीन लाखाहून जास्त जखमी झाले आणि पंधरा लाख बेघर झाले. या नैसर्गिक संकटात त्या गरीब देशाला मदत करण्यासाठी जगातून मदतीचा ओघ सुरु झाला. त्यात आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघटनांचाही समावेश होता. त्यातील एक ऑक्सफॅम ही मोठी ब्रिटीश संस्था. या संस्थेचा वार्षिक खर्च ५५ कोटी डॉलर्स असतो, तीत ५००० नोकरदार आहेत तर संस्थेबरोबर २७,००० स्वयंसेवक काम करतात. जगातील नव्वद देशांत ऑक्सफॅम प्रसंगी स्थानिक भागीदारांबरोबर कार्यरत आहे.

या संस्थेच्या कर्मचाऱ्यांची हैतीमधील गैर-वर्तणूक आता उघड होत आहे आणि ती धक्कादायक आहे. भूकंपग्रस्त प्रदेशात अन्न, वस्त्र, पाणी सगळ्याचाच अचानक अभाव होतो. आधीच दरिद्री देशात लोकांच्या जीवन-मरणाचा प्रश्न अशा वेळी गंभीर होतो. स्वयंसेवी संघटनांकडून हे क्लेश कमी व्हावेत ही अपेक्षा असते. ऑक्सफॅम चे स्वयंसेवक जबाबदारीने तर वागले नाहीतच पण कसेही वागायची मुभा मिळाल्यासारखे त्यांनी वर्तन केले.

अनेक कर्मचारी संध्याकाळी निवास-स्थानी पोचल्यावर स्थानिक वेश्यांना तेथे आणत. काही वेळा वेश्यांना आणून sex-parties ही घेण्यात येत असत. या दरम्यान तेथे असणाऱ्या एका स्त्री कर्मचाऱ्याच्या सांगण्याप्रमाणे, निवास-स्थानातील एक खोली या कार्यक्रमासाठी आरक्षित असे. प्रत्येक इच्छुकाला विशिष्ट वेळ देण्यात येत असे. संध्याकाळी या खोलीत कंडोम असलेली एक बास्केट ठेवण्यात येई, ती दुसऱ्या दिवशी रिकामी असे.

हैतीमध्ये वेश्या-व्यवसाय बेकायदेशीर आहे. म्हणजे, अशा स्वयंसेवकांकडून नीतीमान आचाराची अपेक्षा तर धुळीला मिळालीच शिवाय त्यांनी स्थानिक कायदाही मोडला. फक्त वेश्याच नव्हे तर भूकंपग्रस्त अल्पवयीन मुली, महिलांवरही अन्न, वस्त्र ही 'आमिषे' दाखवून असेच संबंध लादण्यात आले. (वस्तुत: या गोष्टींचा पुरवठा करण्यासाठी तर ऑक्सफॅम तेथे गेले होते.) म्हणजे हे तर बलात्कारच.

ज्या काही कर्मचाऱ्यांनी हे प्रकार उघडकीला आणण्याचा प्रयत्न केला, त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले व प्रकरण दाबून ठेवण्यात आले. त्यातील एकाला शारीरिक छळाची धमकीही देण्यात आली. काही मंडळींनी ऑफिसच्या कॉम्प्युटरवरून आपल्या लॅपटॉपवर पोर्नोग्राफीही कॉपी करून घेतली!

विशेष म्हणजे, हैतीच्या संकट-निवारण टीमचा प्रमुख गेली अनेक वर्षे तरी हा उद्योग करत असे. लायबेरिया नावाचा आफ्रिकेतील देश, चाड नावाचा तिथला दुसरा देश, मग हैती आणि नंतर बांगलादेशात -विविध स्वयंसेवी संघटनांमध्ये तो वरिष्ठ पदावर होता. हे प्रकार अंतर्गत चौकशीत दहा वर्षांपूर्वी ऑक्सफॅमच्या उघडकीला येऊनही, त्याला पुढच्या नोकरीसाठी शिफारसपत्रे देण्यात आली. (पश्चिमेत तुमच्या शैक्षणिक पात्रतेबरोबर आणि अनुभवाबरोबर हे शिफारसपत्र तितकेच महत्त्वाचे असते. त्याखेरीज तुम्ही लायक असलात तरी नोकरी मिळत नाही.) म्हणजे नवीन माणूस नोकरीवर घ्यायच्या प्रक्रियेतील स्वयंसेवी संघटनांचा अक्षम्य गहाळपणाही दिसून येतो.

कित्येक वर्षांपासून जगभर अनेक देशांतील संकटग्रस्त जनतेला मदत करून ऑक्सफॅमने मिळवलेली प्रतिष्ठा ही कृत्ये उघडकीला आल्याने काही दिवसांत नष्ट झाली. याचे दोन-तीन संकेत गंभीर आहेत - एक - एकूणच स्वयंसेवी क्षेत्राची विश्वासार्हता कमी होणे, दुसरे म्हणजे, स्वस्तात आणि सहज स्त्रिया भोगायला मिळण्यासाठी काही लोकांनी स्वयंसेवी संस्थांचा जगभरातील संचार ही संधी हेतुत: हेरलेली दिसते. एकूण स्वयंसेवी संघटनांबद्दलचे तात्त्विक आक्षेप बाजूला ठेवूनही हे संकेत अस्वस्थ करणारे आहेत. आता ऑक्सफॅमला सरकारी तिजोरीतून होणारी मदतही बंद होण्याची शक्यता आहे.